The Bhabha Atomic Research Centre
Employees' Co-op. Credit Society Ltd., Mumbai
(Registration No. 29770)

Ref. No. : BARC / CS / 2164

ISO 9001:2015 Certified

Date : 9 सप्टेंबर 2022

# अधिसूचना

दि भाभा अणुसंशोधन केंद्र कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या सर्व सभासदांना या सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आपल्या पतसंस्थेच्या अधिमंडळाची 61वी वार्षिक सर्वसाधारण सभा **मिश्र पध्दतीने (हायब्रिड मोड) रविवार दि. 25 सप्टेंबर 2022 रोजी दुपारी 4.00 वाजता डी.ए.ई. कनव्हेंशन सेंटर, अणुशक्ती नगर** येथे खालील कामकाजासाठी आयोजित केलेली आहे.

**सभेपुढील विषय:**

1. दि. 15 जानेवारी 2022 रोजी झालेल्या 60 व्या ऑनलाईन वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
2. 1 एप्रिल 2021 ते 31 मार्च 2022 या कालावधीचा वार्षिक अहवाल, शासकीय लेखापरीक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकारुन त्यास मंजुरी देणे.
3. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा विभागणीस मान्यता देणे तसेच सन 2022-2023 च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
4. शासकीय लेखापरीक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक यांच्या सन 2021-2022 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.
5. सन 2022-2023 या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक यांच्या नेमणुकीस मान्यता देणे.
6. सन 2020-2021 या आर्थिक वर्षाच्या हिशोब तपासणी अहवालाची व त्यासंबंधीच्या दोष दुरुस्ती अहवालाची (compliance report) नोंद घेणे.
7. संचालक मंडळाने सुचविलेल्या उपविधी दुरुस्तीस (परिशिष्ट अ प्रमाणे ) मंजुरी देणे.
8. अधिमंडळाच्या 61 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
9. माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांबाबत विचार करणे.

**कृपया संस्थेच्या मा. सभासदांनी सभेस उपस्थित रहावे ही विनंती.**

THE BARC EMPL. CO-OP. CR. SOC. LTD. Reg. No. 29770 OF 30-11-61

(संजय आर. गावंडे)
मानद सचिव
संचालक मंडळाच्या वतीने

दिनांकः 9 सप्टेंबर 2022
मुंबई 400 085

**टिपः**

- सर्वसाधारण सभेच्या दिवशी दुपारी 4.00 वाजेपर्यंत आवश्यक गणसंख्या उपस्थिती आढळून आली नाही तर सभा स्थगित केली जाईल व अशी स्थगित सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी दुपारी 4.30 वाजता गणपूर्तीशिवाय घेतली जाईल आणि त्यात घेतलेले निर्णय सर्व सभासदांना बंधनकारक राहतील.
- ६०व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतान्त व ६१वा वार्षिक अहवाल याच्या प्रती संस्थेच्या वेबसाईटवर (https://www.barcsociety.com) व कार्यालयात दि.१३ सप्टेंबर २०२२ पासून उपलब्ध होतील.
- सभेच्या विषयपत्रिकेतील अनुषंगाने सभासदांना काही माहिती, सुचना किंवा प्रश्न सभेपुढे मांडावयाचे असतील तर ते त्यांनी लेखी स्वरुपात दिनांक 19 सप्टेंबर 2022 पर्यंत सोसायटीच्या कार्यालयात दिले पाहिजेत. अशा विषयपत्रिकेतील विषयाच्या अनुषंगाने ज्या सभासदानी लेखी स्वरूपात सुचना/ प्रश्न दिले आहेत त्यास सभेच्या विषय पत्रिकेतील विषयाचे वेळी सभेमध्ये प्राधान्य देण्यात येईल.
- *ज्या सभासदांनी मागील तीन वर्षांचा लाभांश घेतला नसेल तर तो त्यांनी सोसायटीच्या कार्यालयीन वेळेत येऊन दि. 31 मार्च 2023 पूर्वी घ्यावा* अन्यथा असा लाभांश वैधानिक गंगाजळी निधी खात्यात वर्ग करण्यात येईल.
- 61 व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी देण्यात येणाऱ्या कुपन्स वितरणाबाबत स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

**WITH A REQUEST TO PERMIT TO DISPLAY ON BTS**
**CAO(A), BARC**